मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 21 मे 2026 | पान- 1

# महापौर रवि लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी!

## पोलीस आयुक्तालयाच्या समाधान हेल्पलाईनवर फोन आल्याने खळबळ

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे यांना मंगळवारी धमकी दिल्याचे उघडकीस आले आहे. एका व्यक्तीने पोलिसांच्या हेल्पलाईनवर ही धमकी देण्यात आली आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीचे दोनवेळा भेट झाल्याचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले.



महापौर रवी लांडगे म्हणाले, समाधान हेल्पलाईनवर फोन करुन रवी लांडगे यांना मारुन टाकणार असे संबंधितांने सांगितले होते. छायाचित्र पाहिल्यानंतर ती व्यक्ती दोनवेळा मला घरी भेटून गेला असल्याचे लक्षात आले. त्याला दोन वर्षे होऊन गेले. आजीच्या तेराव्याच्या कार्यक्रमाला ते येऊन गेले होते. मला एक पुस्तकही भेट देऊन गेले होते. त्यावेळी मला काही जाणवले नाही. त्या व्यक्तीचा घटस्फोट झाला आहे. आई-वडिलांपासून वेगळे राहतात. मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील असून चिखलीत राहतात. त्यांची मानसिक स्थिती खालावली असल्याने त्यांनी धमकी दिल्याचे निदर्शनास आले आहे.

दोन वर्षानंतर त्यांच्याशी माझा कधीही संपर्क झाला नाही. पोलिसांनी मंगळवारी रात्री साडेदहा वाजता मला याबाबतची माहिती दिली. ते क्रीडा क्षेत्रातील कामासाठी मला भेटायला आले होते. त्यावेळी थोडाच संवाद झाला होता. क्रीडा क्षेत्रात कार्य करायचे असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यावेळी प्रशासकीय राजवट असल्याने महापालिकेतून नव्हे तर मी वैयक्तीकरित्या मदत करेल असे त्यांना सांगितले होते. एवढाच संवाद झाला होता. कोणाच्या सांगण्यावरुन धमकी दिली असेल असे मला वाटत नाही. त्या व्यक्तीने थेट पोलिसांना फोन केला. त्यामुळे गुन्हा दाखल करता येत नाही. मला किंवा माझ्या कुटुंबातील सदस्याला धमकावण्याचा प्रकार केला नाही. पोलिसांनी समज देऊन त्याला सोडले असल्याचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले.

### पोलिसांनी समज देऊन सोडले

» समाधान हेल्पलाईनवर फोन आलेल्या मोबाईलचे लोकेशन पोलिसांनी तपासले. त्यानंतर आशिष जमदाडे पाटील याला चिखली येथून पोलिसांनी शोधून काढले. त्याला भोसरी पोलीस ठाण्यात आणून कसून चौकशी करण्यात आली. त्यामध्ये त्याने नैराश्येतून महापौर रवी लांडगे यांना धमकी देण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या समाधान हेल्पलाईनवर फोन केल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनीही त्याच्या जवळच्या नातेवाईकांकडे आणि तो राहत असलेल्या भागातील लोकांकडे त्याची चौकशी केली. त्याची मानसिक स्थिती ठीक नसल्याने त्याने नैराश्येतून हे कृत्य केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे त्याला कडक समज देऊन घरी सोडल्याचे पोलिसांनी सांगितले.

# 'जॉगर्स पार्क' परिसरातील अनधिकृत बांधकामावर महापालिकेची कारवाई

## महापालिकेची मोठी कारवाई; 1500 चौरस मीटरवरील अनधिकृत बांधकामे हटवली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्र.११ येथील जॉगर्स पार्क उद्यान परिसरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत सुमारे १५०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. शहरातील सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली.



आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान उप आयुक्त अतुल पाटील, प्रशासन अधिकारी महादेव बोरे, बांधकाम परवानगी विभागाचे उप अभियंता किरण सगर व कनिष्ठ अभियंता प्रताप मोरे, तसेच उद्यान स्थापत्य व क्रीडा विभागाचे कनिष्ठ अभियंता वैभव विटकरे उपस्थित होते. याशिवाय बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीट निरीक्षक) साक्षी जांभुळकर, निकिता भोईटे, विकास वारभुवन आणि रूपक शिनगारे यांनीही कारवाईत सक्रिय सहभाग नोंदविला.

सदर कारवाईसाठी फ, अ आणि क क्षेत्रीय कार्यालयांमधील एकूण ५७ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले होते. तसेच १७ अतिक्रमण पोलीस, ६ जेसीबी मशीन, ८ मजूर आणि ३ वाहन चालक यांच्या सहाय्याने ही कारवाई प्रभावीपणे पार पाडण्यात आली.

> “ शहरातील सार्वजनिक जागा, उद्याने आणि नागरिकांसाठी राखीव असलेली मोकळी मैदाने अतिक्रमणमुक्त ठेवणे ही महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसह शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी अशा कारवाया यापुढेही सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील.
>
> – डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पाणीपुरवठा, MNGL व अमेनिटीज कराबाबत सकारात्मक चर्चा!

## आयुक्तांची बैठक; सोसायटी फेडरेशन अध्यक्ष संजीवन सांगळे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने माननीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासोबत विविध प्रलंबित प्रश्नांवर महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र नॅचरल गॅस (MNGL), सोसायट्यांचा पाणीपुरवठा, बिल्डरने दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन तसेच महानगरपालिकेकडून अमेनिटीजवर लावण्यात आलेल्या अतिरिक्त कराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीदरम्यान फेडरेशनच्या वतीने सोसायट्यांच्या समस्या ठामपणे मांडण्यात आल्या. विशेषतः बिल्डरने पाणीपुरवठा स्वतःच्या खर्चाने करण्याबाबत दिलेल्या हमीपत्राचे पालन न केल्यामुळे संबंधित बिल्डरवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, हमीपत्रानुसार बिल्डरनेच सोसायट्यांना नियमित पाणीपुरवठा करावा, पाण्यासाठी सोसायट्यांनी केलेला खर्च बिल्डरकडून वसूल करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय ज्या सोसायट्यांमध्ये बिल्डरने ओ.डब्ल्यू.सी. मशीन बसवून दिलेली नाही, त्या संबंधित बिल्डरांवर तसेच अशा गृहप्रकल्पांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. महानगरपालिकेकडून सोसायट्यांच्या अमेनिटीजवर लावण्यात आलेला अतिरिक्त कर चालू आर्थिक वर्षापासून रद्द करावा, हा मुद्दाही फेडरेशनच्या वतीने जोरकसपणे मांडण्यात आला.

> आयुक्तांच्या मीटिंगमध्ये बिल्डरने हमी पत्राचे उल्लंघन केल्यामुळे बिल्डरवर कारवाई करावी, हमीपत्रानुसार बिल्डरनेच पाणी पुरवावे, ज्या सोसायटीमध्ये बिल्डरने ओ.डब्ल्यू. सी. मशीन बसवून दिलेली नाही त्या बिल्डरवर आणि त्या गृहप्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी. चालू आर्थिक वर्षापासून सोसायट्यांवरती लावलेला कर रद्द करावा.हे मुद्दे मीटिंगमध्ये ठामपणे आणि स्पष्टपणे मांडले.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली- -मोशी -चऱ्होली -पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

या सर्व विषयांवर माननीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित मागण्या मान्य केल्या. बिल्डरविरोधात कारवाई करणे, पाणीपुरवठ्याचा खर्च बिल्डरकडून वसूल करून देणे, बिल्डरमार्फतच पाणीपुरवठा सुनिश्चित करणे तसेच अतिरिक्त अमेनिटीज कर माफ करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी बैठकीत सर्व प्रश्न ठामपणे आणि स्पष्टपणे मांडत सोसायटीधारकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविला.

# शहर कोंडीमुक्त करण्यासाठी सक्षम 'पार्किंग पॉलिसी' लवकरच; अभिषेक बारणे

## नव्या पार्किंग धोरणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि व्यावहारिक उपायांचा समावेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. शहरात एक सक्षम आणि शिस्तबद्ध 'पार्किंग पॉलिसी' तयार करण्यासाठी बीआरटीएस विभाग आणि महापालिकेच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त समन्वयाने हे नवे धोरण लवकरच शहरात अंमलात आणले जाणार आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली आहे.



> पिंपरी-चिंचवड वेगाने वाढणारे शहर असून येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी केवळ तात्पुरते उपाय करून चालणार नाही, तर एक शाश्वत आणि शिस्तबद्ध यंत्रणा उभारण्याची गरज आहे. याच उद्देशाने आम्ही या नव्या पार्किंग धोरणावर सविस्तर चर्चा केली आहे. बीआरटीएस विभागाच्या सादरीकरणानंतर त्यात अधिक सुधारणा करण्यासाठीच्या सूचना केल्या आहेत, ज्या या धोरणाला अधिक परिपूर्ण बनवतील. हे धोरण राबवताना केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढाच हेतू नसून, पादचारी आणि सायकल चालवणाऱ्यांनाही सुरक्षित रस्ते मिळवून देणे हा आमचा प्रयत्न आहे. ऑन-स्ट्रीट आणि ऑफ-स्ट्रीट पार्किंगचे दर ठरवताना सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल. सर्व तांत्रिक त्रुटी दूर करून, 'आपले शहर, आपली शिस्त' या भावनेतून हे उत्तम पार्किंग धोरण लवकरच नागरिकांच्या सेवेत आणले जाईल.
>
> **– अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

या बैठकीदरम्यान बीआरटीएस विभागाकडून नवीन पार्किंग पॉलिसीचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या सादरीकरणामध्ये धोरणाची तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू मांडण्यात आली. त्यावर सर्व बाजूंनी सविस्तर चर्चा झाल्यानंतर, धोरण अधिक लोकाभिमुख आणि त्रुटीरहित करण्यासाठी काही महत्त्वाच्या ठिकाणी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा करण्याच्या सूचना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून देण्यात आल्या. या सूचनांचा समावेश करून हे नवीन पार्किंग धोरण अत्यंत प्रभावीपणे आणि लवकरच अंमलात आणले जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या नव्या पार्किंग धोरणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि व्यावहारिक उपायांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक भागाच्या गरजेनुसार 'एरिया बेस्ट पार्किंग' व्यवस्था विकसित केली जाईल, तर नागरिकांच्या सोयीसाठी 'कलर कोडिंग सिस्टीम' लागू केली जाणार आहे. याशिवाय, रस्त्यालगत घर असणाऱ्या स्थानिक रहिवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना विशेष 'पार्किंग परमिट' दिले जाईल. शहरातील मुख्य रस्त्यांवर होणारी जड वाहनांची पार्किंग पूर्णपणे बंद करून त्यांच्यासाठी शहराबाहेर जागा निश्चित केली जाणार आहे. विशेष म्हणजे, अनावश्यक पार्किंग टाळण्यासाठी थेट सॅटेलाईटद्वारे जागांची पडताळणी करण्यात येणार असून, या संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र 'पार्किंग मॅनेजमेंट' कक्ष स्थापन केला जाईल. या धोरणात वाहनचालकांसह पादचारी आणि सायकलस्वारांसाठीही स्वतंत्र व सुरक्षित जागा सुनिश्चित करण्यात आली आहे.

या बैठकीला सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, आयटीडीपी चे प्रतिनिधी आणि इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# पुनावळे-ताथवडे परिसरात धुळीचे साम्राज्य

## रस्ते रखडल्याने नागरिक त्रस्त, पालिका प्रशासनाकडून लवकरच उपाययोजनांचे आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक २५ मधील पुनावळे आणि ताथवडे परिसरात सध्या सुरू असलेल्या विविध गृहप्रकल्प आणि रस्त्यांच्या कामांमुळे मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या उडणाऱ्या धुळीमुळे स्थानिक नागरिक, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाचे तसेच इतर आरोग्याचे गंभीर त्रास सहन करावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, परिसरातील धूळ आटोक्यात आणण्यासाठी रस्त्यांवर नियमित पाण्याची फवारणी करावी आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपचे पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सचिव श्री. नवनाथ ढवळे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे एका पत्राद्वारे केली आहे.





या समस्येबाबत महापालिका प्रशासनाशी संपर्क साधला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती मान्य करत काही तांत्रिक अडचणींमुळे या भागातील मुख्य रस्त्यांचे काम रखडल्याचे स्पष्ट केले. यामध्ये एमएसईबीची हाय टेन्शन लाईन खाली घेणे आणि स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे बॉक्स बसवण्यास झालेला उशीर, यामुळे कामाला गती मिळू शकली नाही. तसेच, 'पिक अवर' रहदारीच्या वेळी दरम्यान या भागात जड वाहनांना बंदी असल्याने काम करण्यासाठी मर्यादित वेळ मिळतो, तर रात्रीच्या वेळी काम करताना आवाजामुळे स्थानिक नागरिकांच्या तक्रारी येतात, अशी अडचण प्रशासनाकडून मांडण्यात आली.

उडणाऱ्या धुळीच्या मुख्य कारणांवर बोलताना ड प्रभागातील स्थापत्य विभागाचे अभियंता सुनील शिंदे यांनी सांगितले की, केवळ रस्त्याच्या कामामुळे धूळ उडत नसून, या भागात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. या बांधकामांच्या ठिकाणी उत्खनन करून ये-जा करणाऱ्या मोठ्या ट्रक्सच्या टायर्ससोबत रस्त्यावर माती येते आणि नंतर वाहनांच्या वर्दळीमुळे या मातीची प्रचंड धूळ संपूर्ण परिसरात पसरते.

पुनावळे-ताथवडे परिसरातील नागरिकांना आणि येथील शाळांमधील विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी, लवकरच विशेष मनुष्यबळ लावून रस्ते पूर्णपणे स्वच्छ करण्यात येतील, असे आश्वासन ही शिंदे यांनी दिले . तसेच, केवळ स्थापत्य विभागच नव्हे तर पर्यावरण आणि आरोग्य विभागाशी समन्वय साधून, धुळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पुढील १५ दिवसांत पाण्याच्या फवारणीसह इतर आवश्यक त्या ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# अनधिकृत इंटरनेट व टी.व्ही. केबल्स ऑपरेटर्सना महापालिकेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेच्या महानगरपालिकेच्या खांबांवरून काही संस्था व व्यक्तींनी टी.व्ही. केबल तसेच इंटरनेटसंबंधित केबल्स अनधिकृतपणे ओढल्याचे निदर्शनास आले आहे. या केबल टाकण्यापूर्वी महानगरपालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नसून, महापालिकेकडून अशा प्रकारची कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही, असे विद्युत विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



महापालिकेच्या खांबांवरून अनधिकृतपणे ओढण्यात आलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्समुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या केबल्समुळे महानगरपालिकेच्या विद्युत खांबांचे व त्यावरील विद्युत व्यवस्थेचे नुकसान झाल्याच्या घटनाही घडल्या असून, यामुळे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या अनधिकृत केबल्समुळे शहराच्या सौंदर्यावरही विपरीत परिणाम होत असून, याबाबत अनेक नागरिक, अशासकीय सेवाभावी संस्था तसेच महानगरपालिकेचे पदाधिकारी व सदस्य यांनी महापालिकेकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतुदीनुसार, महानगरपालिकेच्या खांबांवर पूर्वपरवानगीशिवाय ओढलेल्या इंटरनेट व टी.व्ही. केबल्स या महानगरपालिकेच्या मालमत्तेवरील अतिक्रमण मानले जाते.

प्रत्यक्षात, कोणतीही केबल टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून रितसर परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडून परवाना प्राप्त झाल्यानंतर, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीद्वारे उभारण्यात आलेल्या 'ऑप्टिकल फायबर केबल' (OFC) नेटवर्कचा वापर करणे अथवा त्या डक्टमधून केबल टाकणे आवश्यक असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणतीही नेटवर्क, टी.व्ही. केबल अथवा इतर प्रकारच्या केबल्स टाकण्यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधणे बंधनकारक राहणार आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत सर्व संबंधित केबल ऑपरेटर्स व इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांना पुढील कागदपत्रे त्वरीत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे :

१) वैध परवाना

२) एमएसएमई / जीएसटी प्रमाणपत्र

३) केबल ऑपरेटरचे पूर्ण नाव, संपर्क क्रमांक, स्थानिक कार्यालयाचा पत्ता पुरावा व शॉप अॅक्ट परवाना

४) ऑपरेटरचे केवायसी तपशील – आधार कार्ड / पॅन कार्ड / ओळखपत्र माहिती

५) महापालिकेच्या एसओपी नुसार काम करणे, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचे नियम पाळणे आदी बाबींसंदर्भातील योग्य रकमेच्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र

६) टी.व्ही. / इंटरनेट / दूरध्वनी / वीजपुरवठा व इतर प्रकारच्या केबल्स ओव्हरहेड किंवा अंडरग्राऊंड पद्धतीने कोणत्या ठिकाणापासून कोणत्या ठिकाणापर्यंत टाकण्यात आल्या आहेत, याची तसेच एकूण लांबीची माहिती

७) ओव्हरहेड किंवा अंडरग्राऊंड केबलसाठी यापूर्वी महापालिकेस शुल्क अदा केले असल्यास त्याच्या पावतीची छायांकित प्रत

८) केबल टाकण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या परवान्याची छायांकित प्रत

वरील सर्व कागदपत्रे ३० दिवसांच्या आत विद्युत विभाग, पहिला मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे सादर करावीत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

निर्धारित मुदतीत माहिती व कागदपत्रे सादर न करणाऱ्या केबल ऑपरेटर्सविरोधात महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अशा कारवाईमुळे जनतेस होणाऱ्या गैरसोयीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका जबाबदार राहणार नसून, संबंधित केबल ऑपरेटर्स यांनाच त्यासाठी जबाबदार धरले जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# खडकवासल्यातून सुमारे 2 कोटी लिटर पाणी गेले वाया

## उन्हाळी आवर्तनास बसणार तडाखा, दुरुस्तीसाठी चार दिवस

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या नवीन उजवा मुठा कालव्यास मुंढवा भागातील शिंदे वस्तीत (किलोमीटर २२) अचानक भगदाड पडल्यामुळे सुमारे २ कोटी लिटर पाणी (२० एमएलडी) वाया गेले. भगदाड कशामुळे पडले, याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. यामुळे उन्हाळी आवर्तनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भगदाड भरण्यासाठी कि

# जिल्ह्यातील रस्त्यांची कामे 25 मेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश

## जिल्हा परिषदेकडून विकासकामांना गती; शिक्षण, आरोग्य व सौरऊर्जा प्रकल्पांवर विशेष भर

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्वी रस्तेविकासाची कामे पूर्ण करण्याच्या उद्देशाने बांधकाम विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील रस्त्यांच्या डांबरीकरणाची सर्व कामे 25 मेच्या आत पूर्ण झाली पाहिजेत, असे आदेश प्रशासनाला दिल्याची माहिती जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर